MHST200011932020

**<u>वि.दि.दा.क्र.१९६/२०२३ मधील निशाणी क्र.१२८ वरील आदेश</u>**

वादीने सदरचा अर्ज दावा काढुन टाकणेस ठेवणेचा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा स्पेसिफिक परफॉर्मन्ससाठी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुतकामी दि.०६.१०.२०१७ रोजी मुद्दे काढण्यात आलेले आहेत. त्यानंतर वादीला पुरेशी संधी देवुन देखील त्याने त्याचा पुढील पुरावा दाखल केला नसल्याने अगर पुढील तजवीज केली नसल्याने सदरचा दावा दि.०९.०५.२०२५ रोजी काढुन टाकणेच्या आदेशावर ठेवणेत आला. त्यानंतर वादीने मुदतीचा कोणताही अर्ज अभिलेखावर दाखल केल्याचे दिसुन येत नाही व दावा काढुन टाकणेस ठेवणेचा आदेश रद्द करणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. दावा हा खारीज करणेत आलेला नाही. त्यामुळे खारीज करणेचा आदेश रद्द करणेचा प्रश्नच निर्माण होत नाही. प्रस्तुतचा दावा १४ वर्षे जुना आहे. त्यामुळे, न्यायाचे दृष्टीने वादीला त्याचा पुरावा देण्याची संधी देणे योग्य राहील असे मला वाटते. तसेच तशी संधी नाकारल्यास वादीवर अन्याय होईल. उलटपक्षी वादीला संधी दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. दाव्याचे कामकाजास जो विलंब झालेला आहे त्याची भरपाई खर्चाची रक्कम देवुन करणे शक्य आहे. त्यामुळे मी या निष्कर्षास आलो आहे की, सदरचा अर्ज खर्चासह मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

**आदेश**

१) अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) वादीने खर्चाची रक्कम रुपये ५००/- (रु.पाचशे फक्त) प्रतिवादी यांना दयावी.

३) वरील पुर्तता झाल्यानंतर वादीविरुद्ध दावा खारीज करणेकामी ठेवणेचा आदेश रद्द करणेत येत आहे.

स्थळ : वाई.
दिनांक :१०.०६.२०२५

(ए. ए. पाचरणे)
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
वाई.